लोकमत



# पिंपळगावात सायबर गुन्ह्यावर मार्गदर्शन

**भंडारा :** पिंपळगाव सडक येथील स्नेहा कन्या विद्यालयात क्विक हिल फाउंडेशनतर्फे सायबर गुन्ह्यावर मार्गदर्शन करण्यात आले. अध्यक्षस्थानी माजी मुख्याख्यापिका गीता बोरकर या होत्या. तसेच संस्था सचिव दशरथ गिन्हेपुंजे, ज्येष्ठ शिक्षक विलास कालेजवार, विशेष शिक्षिका शुभांगी निकम यांच्या उपस्थितीत फाउंडेशनचे मार्गदर्शक व माजी विद्यार्थिनी खुशी विनोद मेश्राम व सेजल शिवणकर यांनी सखोलपणे सायबर गुन्ह्यावर मार्गदर्शन केले. लिंकवर क्लिक करण्याआधी तिला पडताळून घ्यावी, अनोळखी कॉल पडताळून वापरणे. सोशल मीडिया वापर जपूनकरणे, स्वतःची माहिती अनोळखी व्यक्तीला देऊ नये, हॅकरपासून सावधान राहावे, असे सांगितले. यावेळी शिक्षक छबीलाल गिन्हेपुंजे, एकनाथ गुंजाळ, प्रेरणा कंगाले, प्रियंका काटेखाये, शिल्पा भुते, प्रमिता भेंडारकर, रजत सिंगनजुडे व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.